दैनिक

# अदिती एक्सप्रेस

दि. १५ फेब्रुवारी २०२६
रविवार
वर्ष ४ थे
अंक १०३
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे    उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे    ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**


### आजचे पंचाग

- दिनांक : १५ फेब्रुवारी २०२६
- वार : रविवार
- माह (अमावस्यांत) : माघ
- माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : त्रयोदशी द्वादशी तिथी (सायंकाळी ०५:०४ पर्यंत) त्यानंतर चतुर्दशी तिथी
- नक्षत्र : उत्तराषाढा नक्षत्र (सायंकाळी ०७:४७ पर्यंत) त्यानंतर श्रवण नक्षत्र
- योग : व्यातीपात योग (१५ फेब्रुवारी पहाटे ०२:४६ पर्यंत) त्यानंतर वरीयान योग
- करण : वाणीजा करण (सायंकाळी ०५:०४ पर्यंत) त्यानंतर विस्ती भद्रा करण
- चंद्र राशी : मकर राशी
- सूर्य राशी : कुंभ राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : सायंकाळी ०५:११ ते सायंकाळी ०६:३७ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:३० ते दुपारी ०१:१६
- सूर्योदय : सकाळी ०७:०८
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:३७
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

# पुलवामा हल्ल्याला ६ वर्षे पूर्ण

## मोदींनी वाहिली शहीद जवानांना श्रद्धांजली



मुंबई: पुलवामा हल्ल्याला आज सहा वर्षे पूर्ण झाली आहेत. याच निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर एक भावूक पोस्ट करत शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली आहे. तसेच १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांना आज संपूर्ण देश अभिवादन करत आहे.

काय म्हणाले पंतप्रधान मोदी ?

पंतप्रधान मोदींनी त्यांच्या आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये जवानांच्या अदम्य साहसाचा गौरव केला. त्यांनी लिहिले की, २०१९ मध्ये आजच्या दिवशी पुलवामामध्ये आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूर वीरांचे स्मरण करताना, त्यांची भक्ती, दृढनिश्चय आणि देशसेवा नेहमीच आपल्या मनात राहील. प्रत्येक भारतीय त्यांच्या धाडसातून शक्ती मिळवतो. जवानांच्या या त्यागामुळेच देश सुरक्षित असून त्यांचे शौर्य प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

'तो'काळा दिवस !

१४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मूहून श्रीनगरला जाणाऱ्या केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ताफ्यावर एका आत्मघाती हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेले वाहन आदळले. या भीषण हल्ल्यात भारताचे ४० जवान शहीद झाले होते. या घटनेमुळे संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली होती. या हल्ल्याचा बदला म्हणून भारताने अवघ्या काही दिवसांतच पाकिस्तानमधील बालाकोट येथील दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक करून शत्रूला **(पान २ वर)**

# गणेश नाईक-एकनाथ शिंदेंमधील संघर्ष पुन्हा उफाळला - मनोमिलन ठरले औटघटकेचे

## नवी मुंबईकरांचे भूखंड घशात घातल्याचा आरोप

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात ठाणे आणि नवी मुंबईतील सत्तासमीकरणे नेहमीच चर्चेचा विषय राहिली आहेत. विशेषतः एकनाथ शिंदे यांनी ठाण्याची कमान हाती घेतल्यापासून गणेश नाईक आणि शिंदे यांच्यात सुप्त संघर्ष सुरू झाला. नाईक मंत्री झाल्यानंतर त्यांनी सुरू केलेल्या जनता दरबारांनी या संघर्षाला व्यापक वळण मिळाले. मात्र, महापालिका निवडणुकीवेळी अचानक या दोन्ही नेत्यांनी मंत्रालयात बंद दाराआड चर्चा केल्याने त्यांचे मनोमिलन झाले की काय, अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्या होत्या. मात्र, आता निवडणुकांचा हंगाम आटोपताच, या दोन्ही नेत्यांमधील संघर्ष पुन्हा उफाळून आला आहे.

वाशी येथील जनता दरबारात सिडको आणि महापालिका प्रशासनाला धारेवर धरताना मंत्री नाईक यांचा संयम सुटलेला पाहायला मिळाला. ते म्हणाले की, मी रुग्णालय, शाळा आणि उद्यानांसाठी भूखंडांची मागणी केली होती. मात्र,



काही दलालांनी संगनमत करून हे भूखंड बिल्डरांच्या घशात घातले आहेत. ज्या मंत्रिमंडळात मी आहे, त्याच मंत्रिमंडळातील नगरविकास खात्याने अशा प्रकारचे काम करावे, याची मला लाज वाटते. जर जनतेच्या हिताची कामे मी करू शकणार नसेल, तर हे मंत्रीपद काय चाटायचे आहे का? असा संतप्त सवाल करीत त्यांनी या खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला.

आपला राग शांत करायचा असेल तर सिडको आणि एमआयडीसीने जनतेच्या हिताचे भूखंड पुन्हा परत करावेत, अशी मागणी त्यांनी केली. मी पक्षाचा आभारी आहे की त्यांनी मला मंत्रीपद दिले, पण याचा अर्थ मुका होऊन बसण्यासाठी मी हे पद स्वीकारलेले नाही, असे सांगत त्यांनी या प्रकरणाबाबत थेट मुख्यमंत्र्यांकडे दाद मागणार असल्याचे स्पष्ट केले.

संघर्षाची कारणे

ठाणे आणि नवी मुंबई या पट्ट्यात स्वतःचे वर्चस्व टिकवण्यासाठी नाईक आणि शिंदे यांच्यात प्रदीर्घ काळापासून संघर्ष सुरू आहे. शिंदे यांनी नवी मुंबईत संघटनात्मक जाळे विणण्यास सुरुवात केल्यापासून नाईक अस्वस्थ होते. महापालिका निवडणुकीआधी प्रभाग रचना आणि नगरसेवक फोडण्यावरून **(पान २ वर)**

## राज्यसरकारच्या मोठा निर्णय!

# १ ते ८ विच्या विद्यार्थ्यांना मिळणार मोफत दप्तर

मुंबई: राज्यसरकारकडून एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार आता पहिले ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर मिळणार आहेत.

४१ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना लाभ:

सविस्तर माहितीनुसार, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवण्यात येणार आहे. यासाठी १६५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत ही दप्तरं पुरवण्यात येणार आहेत. या योजनेचा राज्यातील ४१ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला आहे.



शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) जारी केला. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी अनुकूल आणि आनंददायी शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने म्हटले आहे.

ही योजना 'विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवणे' या विद्यमान योजनेंतर्गतच राबवली जाणार आहे. दप्तर हे शैक्षणिक साहित्याचा भाग असल्याने त्यासाठीचा खर्च संबंधित निधीतूनच करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात नमूद केले आहे.

या दप्तरांच्या खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवण्याचे आदेश देण्यात आले असून, खरेदी प्रक्रियेत उद्योग विभागाच्या **(पान २ वर)**

# १९ फेब्रुवारीपासून धावणार १२ नवीन एसी लोकल; लोकल फेऱ्यांमध्येही वाढ

मुंबई : मुंबईकरांचा लोकल प्रवास अधिक सुखकर आणि गारवा देणारा ठरणार आहे. पश्चिम रेल्वेने प्रवाशांच्या सुविधेसाठी १९ फेब्रुवारीपासून १२ नवीन एसी लोकल फेऱ्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. एसी लोकलची वाढती मागणी आणि प्रवाशांची गर्दी लक्षात घेता हा महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. एसी लोकलसोबतच प्रशासनाने ३ नवीन नॉन-एसी (साध्या) लोकल फेऱ्यादेखील वाढवल्या आहेत. या निर्णयामुळे आता पश्चिम रेल्वेवरील एकूण लोकल फेऱ्यांची संख्या १४१४ वर पोहोचली आहे. सर्वसामान्य प्रवाशांना प्रवासाचे विविध आणि किफायतशीर पर्याय उपलब्ध करून देणे, तसेच पीक अवर्समधील गर्दीचे नियोजन करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. १९ फेब्रुवारीपासून लागू होणाऱ्या या नवीन



वेळापत्रकामुळे पश्चिम रेल्वेवरील प्रवाशांचा प्रवास आता आणखी गतिमान आणि आरामदायी होणार आहे.

पश्चिम रेल्वेवर शनिवार-रविवारही धावणार जादा एसी लोकल

पश्चिम रेल्वेने प्रवाशांच्या सुविधेसाठी आपल्या लोकल सेवेत मोठे बदल केले असून, एसी लोकलच्या फेऱ्यांमध्ये लक्षणीय वाढ केली आहे. जनसंपर्क विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आता एसी लोकलची एकूण संख्या १२१ वरून १३३ वर पोहोचली आहे. यामध्ये ११ साध्या लोकलच्या जागी एसी सेवा सुरू करण्यात येणार असून, एक पूर्णपणे नवीन एसी फेरी वाढवण्यात आली आहे. शनिवार आणि रविवारी सुट्टीच्या दिवशी धावणाऱ्या एसी लोकलची संख्या आता ७७ वरून थेट १०६ करण्यात आली आहे. यामुळे सुट्टीच्या दिवशी फिरणाऱ्या प्रवाशांना गारेगार प्रवास करता येईल. पश्चिम रेल्वेवरील एकूण लोकल सेवांची संख्या आता १४१० वरून १४१४ झाली आहे. वांद्रे ते भाईंदर दरम्यान धावणारी लोकल आता थेट विरारपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे विरारच्या प्रवाशांना उत्तम **(पान २ वर)**

## थेट रिक्षावर कोसळला मेट्रोचा स्लॅब; ३ ते ४ जण जखमी



मुलुंड: मुलूंडमध्ये मेट्रोच्या बांधकामाचा अचानक स्लॅब कोसळ्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. स्लॅबखाली एका व्यक्तीसह दोन वहाने दबल्याची माहिती समोर येत आहे. पोलीस प्रशासन आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आहेत.

मुंबईतील मुलुंड पश्चिम येथे शनिवारी (१४ फेब्रुवारी) दुपारी बांधकाम सुरू असलेल्या सिमेंट मेट्रोच्या खांबाचा काही भाग कोसळला. रस्त्याने जाणाऱ्या रिक्षा आणि एका कारवर हा स्लॅब पडल्याने या घटनेत किमान तीन ते चार जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

एमएमआरडीएने दिलेल्या माहितीनुसार, ही घटना आज दुपारी १२:१५ वाजता मुलुंड अग्निशमन केंद्राजवळील राजीव (मिलान) स्ट्रीटमधील मेट्रो लाईन बांधकामाच्या पियर पी१९६ जवळ घडली. या दुर्घटनेमुळे मुलूंड येथील हा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. या आधी देखील मेट्रो प्रकल्पावर अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. अशातच हा स्लॅब कोसळला आहे. प्राथमिक माहितीनुसार, हा स्लॅब एका चार चाकी गाडीवर आणि रिक्षावर कोसळला आहे. या दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तर दुसरी व्यक्ती गंभीर जखमी झाली आहे.

# पंढरपूर दुहेरी हत्याकांड : अवघ्या १० मिनिटांत मायलेकावर सपासप वार

## तपास अधिकारी बदलले अन् असं उकललं पंढरपूरचं हत्याकांड

पंढरपूर : आषाढी वारीच्या पवित्र काळानंतर पंढरपूरला हादरवून सोडणाऱ्या मायलेकाच्या निर्घृण हत्याकांडाचा तपास लावण्यात पोलिसांना यश आले आहे. गेल्या आठ महिन्यांपासून हे प्रकरण पोलिसांसाठी एक मोठे आव्हान ठरले होते. अनेक तपास अधिकारी बदलले, जनतेचा रोष वाढला आणि आंदोलनेही झाली, मात्र ठोस पुरावा हाती लागत नव्हता. अखेर या गुंतागुंतीच्या प्रकरणाची सूत्रे



खझड अधिकारी प्रशांत डगळे यांच्याकडे सोपवण्यात आली. त्यांनी सूत्रे हाती घेताच तपासाला वेग दिला आणि अवघ्या ३० दिवसांत या प्रकरणाचा छडा लावून आरोपींच्या मुसक्या आवळल्या. प्रशासकीय कौशल्य आणि अचूक तपासाच्या जोरावर पोलिसांनी हे 'ब्लाईंड मर्डर' केस उलगडल्याने शहरवासीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

पंढरपूर शहराच्या मध्यवर्ती वस्तीत रात्रीच्या वेळी घडलेल्या एका भीषण घटनेने संपूर्ण शहर सुन्न झाले आहे. लखन संजय जगताप आणि त्यांची आई सुरेखा जगताप या मायलेकाची त्यांच्याच घरात घुसून निर्घृण हत्या करण्यात आली. अवघ्या दहा मिनिटांच्या कालावधीत आरोपींनी हे रक्ताळलेले क्रौर्य अंगावर आणणारे कृत्य केले. मारेकऱ्यांनी प्रथम लखन या तरुणावर १६ वेळा सपासप वार करून त्याला रक्ताच्या थारोळ्यात पाडले. पोटच्या मुलावर होणारा हा जीवघेणा हल्ला पाहून मदतीसाठी धावलेल्या सुरेखा जगताप यांनाही आरोपींनी सोडले नाही. त्यांच्यावर ९ वार करून त्यांचीही जीवनयात्रा संपवण्यात आली. अत्यंत वर्दळीच्या वस्तीत हे हत्याकांड घडवून आरोपींनी काही क्षणातच पळ काढला. या घटनेमुळे पंढरपुरात दहशतीचे वातावरण पसरले असून, गुन्हेगारांनी पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे केले होते.

या तपासामध्ये घटनास्थळी एकही **(पान २ वर)**

# खलिस्तानी दहशतवादीच्या हत्येच्या कटात भारतीय नागरिकाला अमेरिकेत २४ वर्षांची शिक्षा

नवी दिल्ली- खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नूच्या हत्ये संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. पन्नूच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी भारतीय नागरिक निखिल गुप्ता याला अमेरिकन न्यायालयाने तब्बल २४ वर्षांची शिक्षा सुनावली आहे.



शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) न्यू यॉर्क कोर्टात निखिलने आपला गुन्हा कबूल केला. २९ मे रोजी निखिलच्या शिक्षेची औपचारिक घोषणा केली जाईल. अमेरिकन तपास संस्था एफबीआयने निखिल गुप्ताच्या कबुलीजबाबाबद्दल एक्स वर पोस्ट केले. एफबीआयच्या मते, एका अमेरिकन नागरिकाच्या हत्येचा कट रचण्यात आला होता, जो अमेरिकन एजन्सींनी वेळीच उधळून लावला.

पन्नूच्या हत्येचा कट रचल्याच्या आरोपाखाली ३० जून २०२३ रोजी झेक प्रजासत्ताक पोलिसांनी निखिल गुप्ता याला अटक केली होती. त्यानंतर १४ जून २०२४ रोजी त्याला अमेरिकेत प्रत्यार्पण करण्यात आले. अमेरिकेत त्याच्याविरुद्ध खटला दाखल करण्यात आला, जिथे त्याने आपला गुन्हा कबूल केला. अधिकाऱ्यांनी पुष्टी केली की निखिल गुप्ता, ज्याला निक म्हणूनही ओळखले जाते, त्याने अमेरिकन मॅजिस्ट्रेट न्यायाधीश **(पान २ वर)**

# रेणा साखर कारखान्याच्या ४,२१,१११ व्या पोत्यांचे पूजन

दै. अदिती एक्सप्रेस

दिलीपनगर निवाडा- रेणा सहकारी साखर कारखान्यातील गळीत हंगाम २०२५-२६ मधील उत्पादीत ४,२१,१११ व्या साखर पोत्याचे पुजन कारखान्याचे संस्थापक सहकार महर्षी माजी मंत्री मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन श्री. अनंतराव ठाकुर देशमुख, व्हा. चेअरमन श्री. ड. प्रवीण पाटील व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले.



सदर कार्यक्रमामध्ये कारखान्याचे कर्मचारी यांनी ८७ दिवसात उत्तम गाळप केले असल्याने कारखान्यातील कर्मचारी यांना १० % पगार वाढ करत असल्याचे कारखान्याचे संस्थापक सहकारमहर्षी मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांनी यावेळी जाहीर केले.

कारखान्याने चालु गळीत हंगामाचे गाळप दि. १८/११/२०२५ रोजी चालु झाले असुन कारखान्याने दि. १२/०२/२०२६ अखेर ८७ दिवसात कार्यक्षमतेचा पुरेपुर वापर करुन ४,०७,७७५ मे.टन गाळप करुन बी हेवी मोलसेस व सिरप इथेनॉलसह सरासरी ११.९३% साखर उताऱ्यासह ४,२१,१११ क्विंटल साखर उत्पादीत केली कारखान्याचे आसवाणी प्रकल्पही सुरु आहे यामध्ये ४९२४५०१ लिटर इथेनॉल उत्पादन व तसेच कारखान्याच्या सहविज निर्मिती प्रकल्पातुन ८४४८००० युनिटचे महावितरणा एक्सपोर्ट झाले असल्याची **(पान २ वर)**




## थोर क्रांतिकारी संत श्री सेवालाल महाराज

आज १५ फेब्रुवारी, बंजारा समाजातील महान क्रांतिकारक संत श्री सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती. मध्ययुगात भारतात अनेक क्रांतिकारक संत महात्मे होऊन गेले ज्यांनी आपल्या आपल्या वर्तनातून, कीर्तनातून, विचारातून समाजात भक्तिभाव तर निर्माण केलाच पण येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन होईल असे तत्वज्ञान सांगितले त्यात श्री संत श्री सेवालाल महाराज हे एक होते. संत श्री सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी तांडा गुत्ती बेल्लारी अनंतपुर जिल्हा आंध्रप्रदेश या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक असे होते. भीमा नाईक हे त्याकाळात अतिशय श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखले जात. असे म्हणतात की भीमा नाईक यांच्या घरी इतकी श्रीमंती होती की त्यांच्या सात पिढ्या बसून आरामात जेवण करतील. त्यांच्याकडे सुमारे पाच हजार बैल आणि गाया होत्या. ते ४१ तांड्यांचे नायक होते. घरी लक्ष्मी पाणी भरत असूनही सेवालाल महाराजांचे मन रमत नव्हते. आपल्या बंजारा समाजातील लोक जुन्या रूढी परंपरांना कवटाळून बसला असल्याने बंजारा समाज इतर समाजाच्या मानाने खूप मागे आहे. या समाजातील हाच मागासलेलापणा दूर करण्यासाठी काही तरी करावे असे त्यांना सतत वाटत होते. त्यांच्या आई धर्मली यांनी त्यांना लहानपणीच वीरांच्या गोष्टी सांगितल्या होत्या. आईच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. आपल्या बंजारा समाजात अनेक अनिष्ट चालीरिती आहेत. या अनिष्ट चालीरिती मुळेच समाज मागे आहे हे त्यांनी जाणले. बंजारा समाजाला इतर समाजाच्या बरोबरीने न्यायचे असेल तर त्यांच्यात असणाऱ्या अनिष्ट, बुरसटलेल्या चालीरिती बंद करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे असा विचार करून त्यांनी समाजामध्ये जनजागृती केली. बंजारा समाजातील बांधवांनी अंधश्रद्धेला मूठमाती द्यावी असा त्यांचा आग्रह असायचा. अंधश्रद्धेमुळेच समाज मागे आहे असे त्यांचे ठाम मत होते. कोणत्याही गोष्टीवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका. कोणतीही गोष्ट पारखून, समजून घ्या मगच विश्वास ठेवा असे ते म्हणत. त्यांना गरीब – श्रीमंत, स्त्री – पुरुष असा भेदभाव मान्य नव्हता म्हणूनच घरची श्रीमंती असूनही त्यांनी आपल्या पुतण्याच्या विवाह एका गरीब कुटुंबातील मुलीशी लावून दिला होता. २५० वर्षापूर्वीच श्री संत सेवालाल महाराजांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण समाजाला दिली होती. श्री संत सेवालाल महाराज हे केवळ थोर विचारवंतच नव्हते तर ते एक थोर सेनानीही होते. दिल्लीचा नवाब गुलाब खान मोहंमद खान याच्याशी सेवालाल महाराज यांच्याशी लढाई झाली या लढाईत सेवालाल महाराजांनी मर्दुमकी गाजवत विजय मिळवला. श्री संत सेवालाल महाराजांनी भारतीय स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला त्यावेळी उमाजी नाईक, तंट्या भिल्ल यासारखे शुर सेनानी त्यांच्यासोबत होते. भारतीय इतिहासातील थोर विचारवंत आणि थोर सेनानी अशी ओळख असलेल्या श्री संत सेवालाल महाराजांचे २ जानेवारी १७७३ रोजी रुईगड, तालुका मानोरा जिल्हा वाशिम येथे निधन झाले. थोर विचारवंत, समाजसेवक त्याच सोबत शुर सेनानी असणाऱ्या श्री संत सेवालाल महाराजांचे विचार आजच्याच पिढीला नव्हे तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे. त्यांचे विचार आत्मसाद करून त्या विचारांवर चालण्याचा संकल्प करणे हीच त्यांच्या जन्मदिनी त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. थोर विचारवंत, थोर सेनानी श्री संत सेवालाल महाराजांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# क्रांतिकारी संत संत सेवालाल महाराज

संत कबीराचा एक प्रसिध्द दोहा आहे. जाति न पूछो साधु की ,पूछ लीजिए ज्ञान . मोल करो तरवार का पडा रहन दो म्यान . याचा अर्थ असा होतो की साधुसंताची ,सज्जनांची जात विचारात घेऊ नका.त्यांचे ज्ञान विचारात घ्या.म्यान महत्वाचे नाही ,तलवार महत्वाची आहे.संत ज्ञानदेव,संत तुकाराम ,संत नामदेव ,संत एकनाथ ,संत चोखा,संत सावता,संत सेना,संत गाडगेबाबा अशी अनेक संत महात्मे वेगवेगळ्या जातीत ,वेगवेगळ्या कालखंडात जन्माला आली पण सर्वांनी मानवतावादी कल्याणाची पताका उंच नेली.मानवतावादी कल्याणाची गुढी उंचच नेणा–या अशाच एका महान संताची आज जयंती आहे.त्या संताचे नाव आहे संत सेवालाल महाराज.

निसर्गपूजक ,कृषी संस्कृती रक्षक ,पशूपालक ,काटक अशा आदिम बंजारा समाजाचे अराध्य दैवत म्हणजे संत सेवालाल महाराज होय. त्यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ साली आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील गोलालडोडी तांडा येथे झाला.वडील भीमानायक राठोड रामावत व माता धर्मणी या राजवंशीय जोडप्याचे ते जेष्ठ अपत्य.घरात कृषी सुबत्ता खूप होती.सेवाभाया व त्यांचे तीनही बंधू हापानायक ,बदूनायक,पुरानायक हे अतिशय शूर होते.बंजारा समाज हा तांडा करुन राहतो.बदलत्या काळासोबत बंजारा समाजातही परिवर्तन झालं आहे.पण तरीही लोकजीवन ,संस्कृती ,बोलीभाषा ,पेहराव ,पारंपारिक नृत्य ,लोकगीते या बाबतीत हा समाज स्वतंत्र ओळख कायम ठेऊन आहे.आज तांड्यावरील लोकजीवन स्थिर भासत असले तरी पोटासाठी हंगामी स्थलांतर चुकलेले नाही.पशूपालन व व्यापार हा बंजारा समाजाचा पारंपारिक व्यवसाय होता.त्यासाठी सतत भ्रमंती करावी लागत असे.मोगली आक्रमण व पुढे इंग्रजांच्या काळात पारंपारिक व्यवसाय बुडीत निघाले.त्यामुळे सामाजिक जनजीवनही विस्कळीत झाले.बंजारा समाजाला या बदलत्या परिस्थितीचा खूप मोठा फटक बसला.गुजरात ,कर्नाटक ,महाराष्ट्र ,आंध्र प्रदेश ,मध्य प्रदेश ,उत्तर प्रदेश ,पंजाब अशा प्रांतात हा समाज मोठ्या संख्येने विखुरला गेला.बडद बंजारा व लमाण बंजारा अशा दोन मुख्य उपशाखा असलेला समाज देशभरात काही उपजातींनीही ओळखला जातो.बडद म्हणजे बैल .बैल या पशूधनाशी संबंधित शाखा म्हणजे बडद बंजारा.मीठाचा व्यापार करणारी शाखा म्हणजे लमाण बंजारा. लवण या मीठाच्या समानार्थी शब्दावरुन लम्बाना ,लम्बानी व पुढे फक्त लमानी असा शब्द रुढ झाला.

संत सेवालाल महाराजांच्या जन्मावेळी हा समाज भारतभर विखुरलेला होता.शिक्षणाचा अभाव तर होताच शिवाय पोटापाण्यासाठी व्यवसायाचीही समस्या उभी राहिलेली होती.सेवालाल महाराजांनी जनजागृती केली.स्वतः तांड्या तांड्यावर फिरले.समाज व्यसनाधिनता ,गुन्हेगारी यांनी वेढला गेला होता.महाराजांनी बंजारा समाजाला ऐतिहासिक संस्कृतीची जाणीव करुन दिली.लडी भजन ,सत्संग ,भजन यामधून लोकांना साध्या सरळ सोप्या भाषेत शिकवण दिली.थाळी नादावर आधारित भजन हा प्रकार आजही रुढ आहे.सेवालाल महाराजांची शिकवण आजही बंजारा समूहाला तोंडपाठ आहे.

सेवालाल महाराजांनी सांगितलेली सात महत्वाची तत्वे ही सकल मानव जातीच्या कल्याणासाठी आजही उपयोगी अशी आहेत.

१.सत्य..... सत्य जाणणे यातच जीवनाचे सार आहे.सत्य हेच जीवन आहे.महाराज सोप्या भाषेत सत्याचे महत्व सांगताना म्हणायचे की माणसाच्या आयुष्यात तीन आंघोळी फार महत्वाच्या आहेत.पहिली आंघोळ म्हणजे जन्म झाल्यानंतरची आंघोळ.ही आंघोळ तुमचं जीवन सुरु करते.दुसरी आंघोळ म्हणजे लग्नावेळेसची आंघोळ . ही आंघोळ तुमचं गृहस्थ आश्रमीचं जीवन सुरु करते.तिसरी अंघोळ म्हणजे अंत्यविधी पूर्वीची आंघोळ.ही आंघोळ आपलं शारीरिक कार्य संपल्याची खूण असते.प्रत्येक टप्प्यावरील जीवनकार्य महाराज समजून सांगत असत.

२. ब्रम्हचर्य .. सत्य जाणून घेण्याच्या पायरीवरील महत्वाचा टप्पा म्हणजे ब्रम्हचर्य .

३.अहिंसा..सेवालाल महाराजांनी अहिंसा तत्वाचा पुरस्कार केला होता. अहिंसा म्हणजे केवळ कोणाची हत्या करणे नव्हे तर काया ,वाचा मनाने कोणालाही न दुखविणे होय.सेवालाल महाराज स्वतः जगदंबा ,तुळजाभवानी ,शितला मातेचे भक्त होते.देवीचा कोप होऊ नये म्हणून बंजारा समाज पशूबळी देत असे.महाराजांनी या प्रथेला विरोध केला.देवी म्हणजे आई आहे.आई कधी लेकरांवर कोपत नसते असं त्यांनी सांगितलं.पशूबळी ऐवजी त्यांनी गहू –गूळ –तूप हा नैवेद्य सुरु केला.

महाराजांनी अहिंसेचा पुरस्कार केला असली तरी अन्यायाविरुद्ध लढण्याची हाक दिलेली होती.काठीला तलवार व दगडाला बॉम्ब समजावे. हीच आपली पारंपारिक हत्यारे आहेत. गुलाबखानासोबत झालेल्या लढाईत याच शस्त्राने त्यांच्या भावांनी युद्ध जिंकले होते.

४.सद्गुण धारण करणे ..मनुष्याचे खरे धन सद्गुण आहे.याशिवाय जीवन नाही. दुःखरुपी भवसागर तरुन जाण्यासाठी सद्गुण आपल्यात विकसित करणे आवश्यक आहे. ५.कोणालाही दंडित न करणे-- गोरगरीबांना वेगवेगळ्या कारणाने दंड आकारुन ,त्यांचे शोषण करुन स्वतःचे पोट भरणा–या लोकांना सेवालाल महाराज कडक शब्दात फटकारत असत.ते म्हणायचे

गोर गरीबेन डांडन खाये –सात पिढी नरकेमा जाये ओरे वंशेपर कोनी रिये पायरीरो भाटा बनीयेर

म्हणजे दंडामुडपी करून खाणारांच्या सात पिढ्या नरकात जातील ,त्याचा वंश बुडेल व तो पायरीचा धोंडा बनेल.यावरुन महाराजांना शोषितांविरुद्ध किती तिटकारा होता याची जाणीव होते.६.कपटनीतीचा त्याग करणे -- छळ ,कपट ,बेईमानी करणारांची महाराज कान उघडणी करत असत.मानवतेला काळीमा फासणा–या गोष्टींपासून दूर राहा असं ते सांगायचे.

७. चोरी न करणे - बंजारा समाजात त्याकाळी चोरी करण्याचे प्रमाण खूप वाढले होते.महाराज म्हणायचे चोरी करणा–या थोड्या लोकांमुळे संपूर्ण समाजाची बदनामी होते.चोरी करणारांच्या हातात बेडी पडते.चोरी करून जगू नका.कष्टाची भाकरी खा.नीती नियमाने वागा.

समाजामधील वाईट प्रवृत्ती निघाव्यात म्हणून महाराज तांड्यातांड्यावर हिंडून प्रवचने देत असत.

क्रांतीकारी संत ---संत सेवालाल महाराज क्रांताकारी संत होते.क्रांताकारी म्हटलं की लोकांना वाटतं ढाल तलवारी बंदुकीच असतील.महाराज शस्त्रांच्या पठडीतील क्रांताकारी नव्हते,समाज सुधारणेतील क्रांतीकारक होते.त्या काळातील लोकजीवन व सेवालाल महाराजांचे कार्य यांचा तुलनात्मक अभ्यास केला की सेवालाल महाराजांची क्रांतीकारी विचारसरणी लक्षात येते. अक्षरशत्रू झालेल्या बंजारा समाजाला त्यांनी शिक्षणाचे महत्व सांगितले. स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला.पशुबळी प्रथा बंद केली. स्वतः श्रीमंत असूनही आपला पुतण्या जेतालालचा विवाह त्यांनी सामका नावाच्या अत्यंत गरीब घरातील मुलीसोबत लावून दिला.राजा बोले अन् दल हले असे एक मराठी म्हण प्रचलित आहे.बंजारा समाजातही नायक बोले तांडा चाले ही पद्धत होते.जात पंचायतीत नायक ,कारभारी यांच्याकडून अन्याय होत असे. नायक पद्धतीला त्यांनी विरोध केला. त्यागी ,दूरदर्शिता , बुद्धीप्रामाण्यावर आधारित असे त्यांचे जीवनकार्य आहे.

सेवालाल महाराजांच्या काही प्रचलित टोपणनावावरुनही महाराजांची थोरवी आपल्या लक्षात येईल.

१.तोडावळो....महाराज आपल्या शिरी घुगू टोपावर तोडा वापरत असत. म्हणून त्यांना तोडावळो म्हणत.

२.मोतीवाळो..महाराजांच्या कार्याचा गुणगौरव म्हणून त्यांना मोत्याची माळ भेट दिलेली होती.बंजारा समाजाला या घटनेचा सार्थ अभिमान होता.म्हणून लोक त्यांना मोतीवाळो म्हणत.

३.गादीवाळो...सेवालाल महाराजांचे वडील भीमानायक राठोड हे ५२ तांड्यांचे नायक व पाच हजारापेक्षा जास्त पशूधनाचे मालक होते.रामावत या राजघराण्याचे ते वंशज होते.सर्व समाजाला त्यांच्या राजगादी वारशाचा अभिमान होता.म्हणून समाज त्यांना गादीवाळो या नावानेही ओळखत असे.

४.पोरीया तारा...धृव तारा जसा अढळ व मार्गदर्शक आहे.तसं सेवालाल महाराजांचे स्थान आहे.गोर बंजारा समाजाचे ते मार्गदर्शक ,दिशादर्शक आहेत या टोपणनावावरुन महाराजांची लोकप्रियता ध्यानी येते.संत सेवालाल महाराज व आपला महाराष्ट्रआपल्या महाराष्ट्रात बीड ,यवतमाळ ,नांदेड ,उस्मानाबाद ,परभणी ,हिंगोली जिल्ह्यात बंजारा समाज बहूसंख्येने आहे.सेवालाल महाराजांनी महाराष्ट्रात अनेक वर्षे घालविली आहेत.महाराजांना अत्यल्प आयुष्य लाभले.उणंपुरं पस्तीस वर्षांचं आयुष्य त्यांना लाभलं. त्यांना लंबी जिंदगी नाही लाभली पण त्यांनी जिंदगी मात्र बडी करुन दाखविली.महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरून त्यांनी परदेशी सत्ताधीशांशी व्यापार केला होता.धरमतर खाडीचे नाव त्यांच्या धर्मानायक या मित्रावरुनच पडले आहे.गागोदे गावात सेवाभायाचे मंदीर आहे.जवाहरलाल नेहरू धक्का म्हणजेच सेवाभायाचा धक्का होता.

तीर्थक्षेत्र पोहरादेवी..

यवतमाळ जिल्ह्यातील पोहरादेवीला बंजारा समाजाचे तीर्थक्षेत्र म्हटले जाते. वर्षातून चार वेळा तेथे यात्रा भरते. रामनवमीला लाखोंच्या संख्येने बंजारा समाज पोहरादेवीला येतो. संत सेवालाल महाराज बंजारा समाजाचे अराध्य दैवत असले तरी त्यांची शिकवण सर्वच जाती धर्मासाठी पोरीया तारा म्हणजे दीपस्तंभी मार्गदर्शकच आहे.अशा या महान संतास त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**लेखक – शंकर नामदेव गच्चे**
(एम.ए.बी.एड्.) जि.प. प्रा.शा.
वायवाडी ता.हिमायतनगर जि. नांदेड
मोबाईल नंबर–८२७५३९०४१०

## वंदे मातरम् ला राष्ट्रगीताचा दर्जा मिळवून देण्याची जबाबदारी प्रत्येक राष्ट्रप्रेमी भारतीयाची आहे : पार्थ बावस्कर



लातूर : रवींद्रनाथ टागोर यांनी जन - गण - मन ऐवजी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांची रचना असलेल्या वंदे मातरम् ला राष्ट्रगीत करा असे म्हटले होते. रिजेक्ट टू रिस्पेक्ट असा प्रवास राहिलेल्या वंदे मातरम् ला आता राष्ट्रगीताचा दर्जा मिळवून देण्याची जबाबदारी प्रत्येक राष्ट्रप्रेमी भारतीयाची आहे, असे प्रतिपादन इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक पार्थ बावस्कर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नवनिर्माण व्याख्यानमाला २०२६ चे तृतीय पुष्प शुक्रवारी ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पार्थ बावस्कर यांनी ' वंदे मातरम् - राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन ' या विषयावर गुंफले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे चे कुलसचिव डॉ. अमित शेष हे उपस्थित होते. मंचावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, सौ. प्राजक्ता सरदेशमुख, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, प्राचार्य डॉ. रवींद्र शेंडगे,सुधीर धुतेकर, एस.डी. कुलकर्णी यांची उपस्थिती होती. उपस्थितांना अगदी मंत्रमुग्ध करताना पार्थ बावस्कर यांनी वंदे मातरम् या गीताच्या निर्मितीची पार्श्वभूमी सविस्तरपणे विशद केली. वंदे मातरम् या राष्ट्रगीताने अनेक राष्ट्रभक्त निर्माण केल्याचे सांगताना त्यांनी वासुदेव बळवंत फडके, चंद्रशेखर आझाद, मदनलाल धिंग्रा, सूर्यसेन, अल्लुरी राजू, कनकलता बहुआ, मातंगिनी हजरा , तुळेश्वरी देवी अशा अनेक क्रांतिवीरांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी वंदे मातरम् साठी प्राणांचे बलिदान दिल्याची माहिती पार्थ बावस्कर यांनी अनेक क्रांतिकारकांची उदाहरणे देऊन दिली.

वंदे मातरम् या शब्दाने ब्रिटिशांना अक्षरही सळो की पळो करून सोडले होते. वंदे मातरम् ला ब्रिटिशांनी भारतीयांच्या मनातून काढण्याचा प्रयत्न केल. मात्र, त्यात त्यांना यश आले नाही. वंदे मातरम् ची विद्यार्थी दशेतच प्रेरणा मिळाल्याने रा. स्व. संघाचे आद्य संस्थापक केशव बळीराम हेडगेवार यांच्यासारखे राष्ट्रप्रेमी युगपुरुष या भारतमातेला मिळाले. त्याकाळी ब्रिटिशांना आवरण्याचा मोठा लढा बंगालमधील संतांनी दिला होता, याचे स्मरणही त्यांनी करून दिले. वासुदेव बळवंत फडके यांनी स्वतःला राष्ट्र कार्यात झोकून देण्यामागची वास्तवताही बावस्कर यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिली. रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात संपूर्ण वंदे मातरम् जाहीरपणे गायले होते,असेही त्यांनी सांगितले. वंदे मातरम् चा जयघोष करत असंख्य राष्ट्रभक्तांनी मृत्यूला कवटाळल्याचे सांगताना पार्थ बावस्कर यांचा कंठ भरून आला. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी वंदे मातरम् ला राष्ट्रगीत म्हणून मान्यता दिली नव्हती. आता त्याच क्रांतिकारी गीताचा प्रवास रिजेक्ट टू रिस्पेक्ट असा सुरु झाल्याचे त्यांनी गौरवाने नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. गोळवलकर गुरुजींच्या अतुलनीय कार्याची माहिती विशद करताना त्यांनी गुरुजी ज्या भागात प्रवास करत असत एकाच भाषेत बौद्धिक देत असल्याचे सांगताना गुरुजींना कधीही भाषेची चणचण जाणवली नसल्याचे नमूद केले. वंदे मातरम् ला त्याकाळी क्रांतिकारकांचा रक्तयज्ञ असेही संबोधले जात असल्याचे सरदेशमुख यांनी सांगितले.

प्रा. शरद पाडे यांनी वंदे मातरम् गौरव गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन प्रल्हाद माले , राजश्री कुलकर्णी यांनी केले. डॉ. वृषाली देशमुख यांच्या संपूर्ण वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली.

### पान १ वरून

### पुलवामा...

चोख प्रत्युत्तर दिले होते.

उपराष्ट्रपतींनी वाहिली श्रद्धांजली:

पंतप्रधानांसह उपराष्ट्रपतींनी देखील जवानांना श्रद्धांजली वाहिली. ते म्हणाले, पुलवामा दहशतवादी हल्ल्यात आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूर सैनिकांना मी श्रद्धांजली वाहतो. त्यांचे सर्वोच्च बलिदान देशाच्या स्मृतीत नेहमीच कोरले जाईल आणि एक मजबूत आणि सुरक्षित भारत निर्माण करण्यासाठी आपल्याला प्रेरणा देत राहील.

### गणेश नाईक...

सुरू झालेला हा वाद काही काळ शांत झाला होता. मंत्रालयातील बंद दाराआड झालेल्या चर्चेनंतर दोन्ही नेत्यांचे मनोमिलन झाल्याचे चित्र निर्माण झाले होते; मात्र गणेश नाईक यांनी थेट नगरविकास खात्यावरच तोफ डागल्याने हा राजकीय संघर्ष आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

### राज्यसरकारच्या...

नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वितरित निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनाला सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

या शाळांना वगळण्यात येणार:

ज्या महानगरपालिकांमध्ये अगोदरच ही योजना राबवली जाते अथवा विद्यार्थ्यांना त्यासाठी निधी दिला जातो. त्या शाळांमध्ये या योजनेचा लाभ देण्यात येणार नाही. पण इतर सरकारी शाळांमध्ये या योजनेतंर्गत मोफत दप्तर देण्यात येणार आहे. या योजनेत चांगली दप्तर मिळावीत अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त केली जात आहे. हलक्या दर्जाची अथवा बाजारगाळे दप्तरांचा पुरवठा करण्यात येऊ नये अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे. नवीन शैक्षणिक वर्षापासून हा उपक्रम सुरू होण्याची शक्यता आहे.

### १९ फेब्रुवारीपासून...

कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. हे सर्व बदल १९ फेब्रुवारीपासून लागू होणार असून, यामुळे कार्यालयीन वेळेसह सुट्टीच्या दिवशीही प्रवाशांची गर्दी विभागली जाण्यास मदत होणार आहे.

### पंढरपूर दुहेरी...

उउढत कॅमेरा नसल्याने आणि ठोस धागेदोरे मिळत नसल्याने हे प्रकरण 'ब्लाईंड मर्डर' ठरले होते. मात्र, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी हार न मानता तपासाची चक्रं शून्यातून फिरवली. पुराव्याअभावी डगळे यांनी तांत्रिक तपासावर भर दिला. त्यांनी तब्बल १,५०० हून अधिक फोन कॉल्स आणि इंटरनेट रेकॉर्ड्सची सूक्ष्म तपासणी केली. याच अवाढव्य डेटाच्या विश्लेषणातून संशयास्पद हालचालींची एक साखळी तयार झाली, ज्याने पोलिसांना थेट आरोपींच्या उंबरठ्यापर्यंत नेऊन सोडले. केवळ आधुनिक तंत्रज्ञान आणि संयमी तपासाच्या जोरावर पोलिसांनी हे कठीण कोडे सोडवण्यात यश मिळवले आहे.

पंढरपूर येथील दुहेरी हत्याकांडातील आरोपींनी पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी एखाद्या सिनेमाला शोभेल असा बनाव रचला होता, मात्र आयपीएस प्रशांत डगळे यांच्या चाणाक्ष नजरेतून ते सुटू शकले नाहीत. तपासात समोर आलेल्या धक्कादायक माहितीनुसार, आरोपींनी केवळ खूनच केला नाही तर पोलिसांना तपासापासून लांब ठेवण्यासाठी अनेक युक्त्या लढवल्या होत्या. मुख्य आरोपींपैकी एक, विशाल शिंदे नाईक याने खुनानंतर स्वतः पोलीस ठाण्यात फोन करून घटनेची माहिती दिली होती. आपण एक जागरूक नागरिक किंवा खबऱ्या आहोत असे भासवून पोलिसांचा संशय वळवण्याचा त्याचा प्रयत्न होता. हा खून चोरीच्या उद्देशाने झाला आहे असे वाटावे, यासाठी आरोपींनी घरातील ५५ इंची टीव्ही आणि काही मौल्यवान साहित्य लंपास केले होते. मात्र, तपासात हा केवळ पोलिसांना गोंधळात टाकण्यासाठी रचलेला बनाव असल्याचे सिद्ध झाले. खुनासाठी आरोपींनी साधे चाकू किंवा सुरा न वापरता, गवत कापण्याच्या मशीनच्या पात्यांपासून खास घातक हत्यार तयार करून घेतले होते, जेणेकरून तपासात तांत्रिक अडथळे येतील. अखेर 'डिजिटल पुरावे' आणि 'तपासातील चिकाटी' यामुळे आरोपींचा हा मास्टरप्लॅन फसला असून ते आता गजाआड आहेत. या हत्याकांडात एका अल्पवयीन मुलाने आरोपींना मदत केल्याचेही समोर आले आहे. खुनाच्या वेळी पाळत ठेवणाऱ्या व्यक्तीशी पोलिसांच्या खबऱ्याने मैत्री करून त्याच्याकडून महत्त्वाची माहिती मिळवली. यानंतर संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला. या दुहेरी हत्याकांडात विशाल शिंदे नाईक याने अथर्व शिंदे नाईक यांच्या मदतीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी आणि जगताप कुटुंबीय हे शेजारी राहत होते. त्यांच्यातील वैमनस्य हेच खुनामागील प्रमुख कारण असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हत्या केल्यानंतर आरोपी राजस्थानला कामासाठी गेल्याचे तपासात निष्पन्न झाले. हत्येच्या वेळी विशालचा मोबाईल फोन सुमारे एक तास बंद होता. फोन बंद करण्यापूर्वी त्याने सहआरोपी अथर्वशी संपर्क साधल्याचे ठोस पुरावे पोलिसांच्या हाती लागले. याच आधारावर दोघांनाही अटक करण्यात आली.

गेल्या आठ महिन्यांपासून पोलिसांना हुलकावणी देणाऱ्या दुहेरी हत्याकांडातील महत्त्वाचे पुरावे अखेर चंद्रभागा नदीच्या पात्रातून शोधून काढण्यात पोलिसांना यश आले आहे. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर, पोलिसांनी नदीपात्रातून ५५ इंची टीव्ही आणि हत्येसाठी वापरलेले खास हत्यार जप्त केले आहे. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी आरोपींनी घरातून चोरलेला टीव्ही आणि हत्येचे शस्त्र चंद्रभागेत फेकून दिले होते. तांत्रिक तपासापुढे नमतं घेत आरोपींनी हा गुन्हा मान्य केला. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता, त्यांना ९ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणाचा छडा लागत नसल्याने गेल्या आठ महिन्यांपासून पंढरपूर पोलिसांवर टीकेची झोड उठत होती. मात्र, खड्झड प्रशांत डगळे यांनी सूत्रे स्वीकारताच अवघ्या ३० दिवसांत या गुंतागुंतीच्या केसचा निकाल लावून पोलिसांची मान उंचावली आहे.

### खलिस्तानी दहशतवादीच्या...

सारा नेटबर्न यांच्यासमोर आपला गुन्हा कबूल केला आहे. त्याला २९ मे रोजी अमेरिकन जिल्हा न्यायाधीश व्हिक्टर मॅरेरो शिक्षा सुनावणार आहेत.

अमेरिकन एजन्सींनुसार, माजी भारतीय अधिकारी विकास यादवने निखिल गुप्ताला पन्नूच्या हत्येचा कट रचण्यास सांगितले. अमेरिकन न्याय विभागाने असा दावा केला आहे की एका भारतीय सरकारी कर्मचाऱ्याने निखिल गुप्ताला पन्नूची हत्या करण्यासाठी एका हिटमनची व्यवस्था करण्यास सांगितले. मॅनहॅटनमधील फेडरल कोर्टात दाखल केलेल्या आरोपपत्रात हा आरोप करण्यात आला आहे. आरोपपत्रात त्या कर्मचाऱ्याचा उल्लेख सीसी–१असा करण्यात आला आहे.

गुरपतवंत सिंग पन्नू हा मूळचा पंजाबमधील खानकोट येथील रहिवासी आहे. तो सध्या अमेरिकेत राहतो आणि शीख फॉर जस्टिस नावाची संघटना चालवतो. त्याच्याकडे अमेरिका आणि कॅनडा दोन्ही देशांचे नागरिकत्व आहे. २०१९ मध्ये, भारत सरकारने पन्नूची संघटना, एसएफजे, दहशतवादी कारवाया करत असल्याचा आरोप करत बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायद्याअंतर्गत (यूएपीए) बंदी घातली. शिखांसाठी जनमत चाचणीच्या नावाखाली, एसएफजे पंजाबमध्ये फुटीरतावाद आणि अतिरेकी विचारसरणीला पाठिंबा देत होते. २०२० मध्ये, पन्नूवर फुटीरतावादाला प्रोत्साहन देण्याचा आणि पंजाबी शीख तरुणांना शस्त्रे उचलण्यास प्रोत्साहित करण्याचा आरोप होता. त्यानंतर, केंद्र सरकारने १ जुलै २०२० रोजी त्याला यूएपीए अंतर्गत दहशतवादी घोषित केले.

### रेणा साखर...

माहीती कारखान्याचे चेअरमन श्री. अनंतराव ठाकुर देशमुख यांनी दिली.

सदरील कार्यक्रमास लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हा.चेअरमन श्री. प्रमोद जाधव , कारखान्याचे माजी चेअरमन तथा संचालक यशवंतराव पाटील, साखर संघाचे मा.उपाध्यक्ष तथा संचालक आबासाहेब पाटील, धनराज देशमुख, संग्राम माटेकर, तुकाराम कोल्हे, तानाजी कांबळे, शंकरराव पाटील, गोविंद पाटील, रणजित पाटील, ,बालाजी हाके, श्री व सौ. वैशालीताई पंडीतराव माने, श्री व सौ. आमृताताई स्नेहलराव देशमुख, तज्ञ संचालक चंद्रचुड चव्हाण, नरसिंग इंगळे, कार्यलक्षी संचालक आण्णासाहेब पाटील, कार्यकारी संचालक बी.व्ही.मोरे शेतकरी सभासद व कारखान्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# भूम येथे प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांतर्गत खरेदीदार-विक्रेता संमेलनाचे आयोजन

धाराशिव (प्रतिनिधी) - केंद्र व राज्य शासनाच्या आर्थिक सहकार्याने आत्मनिर्भर पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (झचत्रञ्चए) सन २०२०-२१ पासून जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असून या योजनेमुळे अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

ही योजना तसेच उमेद व माविम विभागातून लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या कच्च्या मालाला बाजार पेठ उपलब्ध करून देण्यासाठी दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता भूम येथे खरेदीदार-विक्रेता संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे.

शासनाकडून धाराशिव जिल्ह्याला खवा उद्योगासाठी भौगोलिक मानांकन प्राप्त झाले असून, या संमेलनात दुग्ध प्रक्रिया उद्योग करणाऱ्या उद्योजकांचा माल खरेदी करण्यासाठी विविध खरेदीदार उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रक्रिया केलेल्या मालाच्या खरेदीसाठी थेट करारही करण्यात येणार आहेत. कच्च्या मालावर प्रक्रिया करून अधिक उत्पन्न मिळविण्याचा मार्ग या योजनेतून खुला झाला आहे.

जिल्ह्यात बेरोजगारीचे प्रमाण सातत्याने वाढत असताना अनेक शिक्षित युवकांना रोजगार मिळत नाही. तसेच भांडवला अभावी उद्योग उभारणेही शक्य होत नाही. ही बाब लक्षात घेऊन केंद्र शासनाने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना सुरू केली असून या योजनेतून बेरोजगार युवक, बचत गट, शेतकरी गट, संस्था तसेच ग्रो कंपन्यांना अर्ज करण्याची संधी उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, एकूण कर्जाच्या ३५ टक्के अनुदान शासनाकडून दिले जात असल्याने उद्योग उभारणीस मोठा आधार मिळत आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश असंघटित व अनोंदणी कृत अन्न प्रक्रिया उद्योगांना संघटित व नोंदणीकृत करणे तसेच प्रक्रिया केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा आहे. अन्न प्रक्रिया उद्योगातून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधता येणार असल्याने शेतकरी, बचत गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे,या योजनेत सात-बारा उतारा नसला तरीही लाभ घेता येऊ शकतो. योजना अंमलबजावणीसाठी प्रत्येक तालुका कृषी अधिकारी कार्यालयात मानधन तत्त्वावर कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असून प्रस्ताव सादर करण्यापासून ते मंजुरीपर्यंत मोफत मार्गदर्शन दिले जाते. उद्योग मंजूर झाल्यानंतर तो सक्षमपणे चालवण्यासाठी शासनाकडून ३५ टक्के अनुदान दिले जाते. जिल्ह्यात कच्चा माल मोठ्या प्रमाणात उपलब्ध असला तरी त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग तुलनेने कमी आहेत. त्यामुळे ही योजना जिल्ह्यासाठी अत्यंत उपयुक्त असून जास्तीत जास्त नागरिकांनी अर्ज करून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

या योजने अंतर्गत सन २०२०-२१ पासून चालू आर्थिक वर्षापर्यंत जिल्ह्यात ५०४ प्रस्ताव मंजूर झाले असून त्यापैकी ४१३ उद्योग सुरू झाले आहेत. यामध्ये खवा, तूप, गूळ उद्योग, डाळ उद्योग, बेदाणा, मसाला तसेच पापड उद्योगांचा समावेश आहे. या खरेदीदार-विक्रेता संमेलनात जिल्ह्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी धाराशिव येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात संपर्क साधावा. तसेच संमेलन स्थळी उद्योजकांच्या उपस्थितीसाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# शिळवणी तांडा येथे एच.एस.सी. बोर्ड परीक्षा सुरळीत केंद्रप्रमुख प्रा. सी. एस. मठदेवरू यांची माहिती





देगलूर(प्रतिनिधी): देगलुर तालुक्यातील संवेदनशील असलेल्या शिळवणी तांडा येथील मा. व उ. मा. आश्रम शाळा (केंद्र क्र. १५९) येथे फेब्रुवारी/मार्च २०२६ मधील एच.एस.सी. बोर्ड परीक्षा शांत, शिस्तबद्ध व कॉपीमुक्त वातावरणात सुरळीत पार पडत आहे. परीक्षा केंद्रावर सीसी कॅमेरे तसेच झूम वेब कॅमेऱ्यांच्या सततच्या निगराणीखाली परीक्षा प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येत आहे. परीक्षा कालावधीत पोलीस प्रशासन व बैठे पथक तैनात असल्यामुळे सुरक्षिततेची सर्वतोपरी काळजी घेण्यात आली आहे.

इंग्रजी विषयाच्या पहिल्या पेपरसाठी २७२ विद्यार्थी नोंदणीकृत होते. त्यापैकी २४६ विद्यार्थी उपस्थित राहिले. या दिवशी देगलूर तहसीलचे तहसीलदार भरत सूर्यवंशी यांनी सुमारे दोन तास परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून पाहणी केली व परीक्षा प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले.

दुसऱ्या हिंदी पेपरसाठी ७७ विद्यार्थी नोंदणीकृत होते. त्यापैकी ७० विद्यार्थी उपस्थित होते.

तिसऱ्या मराठी पेपरसाठी १६२ विद्यार्थी नोंदणीकृत असून त्यापैकी १४७ विद्यार्थी उपस्थित होते. मराठी पेपरच्या दिवशी देगलूरचे गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी, शिक्षण विस्तार अधिकारी हमीद दौलताबादी तसेच केंद्रप्रमुख हनमंत जाधव यांनी सुमारे दीड तास केंद्रावर उपस्थित राहून परीक्षा व्यवस्थेची पाहणी केली.

केंद्रसंचालक प्रा. सी. एस. मठदेवरू यांनी सांगितले की, परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना तणावमुक्त, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात परीक्षा देता येत आहे. प्रशासन, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे परीक्षा सुरळीत पार पडत असून पुढील सर्व पेपरही याच नियोजनबद्ध पद्धतीने पार पडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

एकूणच, शिळवणी तांडा येथील परीक्षा केंद्रावर काटेकोर नियोजन, प्रशासनाची सतर्कता,पोलिसांचा कडक बंदोबस्त आणि शिक्षकांचे सहकार्य यामुळे एच.एस.सी. बोर्ड परीक्षा यशस्वीपणे पार पडत असल्याचे दिसून येत आहे.

# श्री सिध्देश्वर यात्रे निमित्त मंदिर परिसरातील काही ठिकाणच्या रोडवरील वाहतुक तात्पुरत्या स्वरुपात बंद करणे बाबत

लातुर - शहरात दिनांक १५/०२/२०२६ रोजी पासून श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाच्या ७३ व्या महाशिवरात्री निमित्त यात्रा भरते व मोठया प्रमाणात उत्साहाने साजरा होते. सदर यात्रे करीता लातूर शहरातून, जिल्हयातून व इतर जिल्हयातून नागरिक मोठया प्रमाणात येतात. यात्रेला येणारे वाहनांमुळे सदर परिसरात वाहतुक कोंडी निर्माण होवू नये म्हणून मंदिर परिसरातील खालील ठिकाणाहून मंदिराकडे येण्यासाठी वाहनांवर बंदी घालणे आवश्यक आहे.

लोकांच्या दळणवळणानिमीत्त त्यांना विविक्षीत ठीकाणी पोहचणेसाठी सदरची अडचण लक्षात घेता दिनांक १५/०२/२०२५ रोजीचे ००.०१ ते यात्रा संपेपर्यंत खालील मार्गावर वाहतुक तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात येत आहे.

दिनांक १५/०२/२०२५ रोजीचे ००.०१ ते यात्रा संपेपर्यंत वाहतुकीस बंद असणारे मार्ग १) रिंग रोड मार्गे मळवटी चौकाकडून मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे मळवटी चौकापर्यंत येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा २) गांधी चौक, हत्ते कॉर्नर, सिध्देश्वर चौक मार्गे मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे सिध्देश्वर चौकापर्यंतच येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा ३) शाहु चौकाकडून ६० फुटी रोड, अब्दुल कलाम चौक मार्गे मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे अब्दुल कलाम चौकापर्यंतच येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा ४) बरकत नगर कडून मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे बरकत नगर कॉर्नर पर्यंतच येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा तरी सर्व नागरीकांनी उक्त आदेशाप्रमाणे वाहतुकीसाठी बंद असल्याचे घोषित करण्यात आलेल्या मार्गाचा वापर न करता पर्यायी मार्गाचा वापर करुन महानगरपालिका व पोलिस प्रशासनास सहकार्य करावे.

# भाट सांगवीत संत गुरू रविदासांचा ६४९ वा जयंती उत्सव



चाकूर / प्रतिनिधी- संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांनी समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. गुरु रविदासांच्या विचारांमध्ये परिवर्तन बदल घडवून आणण्याची शक्ती आहे. त्यांच्या विचारांचा जागर मानव जातीमध्ये होणे गरजेचे आहे. अशा भावना ह.भ.प. बन गुरुजी ( शेंद ) उदगीरकर व ह.भ.प. बंडा महाराज अलगरवाडीकर यांनी संत गुरू रविदास महाराज यांच्या विषयी व्यक्त केल्या.

चाकूर तालुक्यातील भाट सांगवी येथे दिनांक १ फेब्रुवारी २०२६ ( माघ पोर्णिमा रविवार ) रोजी समाज परिवर्तनकार , समतानायक संत गुरू रविदास यांची ६४९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी ह.भ.प. बन गुरुजी ( शेंद ) उदगीरकर व ह.भ.प. बंडा महाराज अलगरडीकर यांनी समाज परिवर्तनकार संत गुरू रविदास महाराज यांच्या समाजकार्याला उजाळा दिला.

आयोजित दोन दिवसीय उत्सवात भाट सांगवी ग्रामस्थांसह पंचक्रोशितील भक्त गण महिला-पुरुष मंडळींनी मोठया संख्येने उपस्थिती नोंदविली होती. दिनांक ३१ जानेवारी २०२६ ( शनिवार ) रोजी ह.भ.प. बन गुरुजी उदगीरकर यांचे व दिनांक १ फेब्रुवारी २०२६ (रविवार ) रोजी ह.भ.प. बंडा महाराज अलगरवाडीकर यांची प्रबोधनपर किर्तने ठेवण्यात आली होती. त्यांनी संत गुरू रविदास महाराज यांनी केलेल्या समाज कार्याला उजाळा दिला.१ फेब्रुवारी २०२६ ( रविवार ) रोजी महाप्रसाद वाटपाणे जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नामदेव कांबळे, सोपान कांबळे, विठ्ठल वाघमारे, भगवान वाघमारे, हणमंत वाघमारे, वैजनाथ कांबळे, बालाजी कांबळे ,किशन कांबळे, विकास वाघमारे, विश्वनाथ कांबळे, कैलास वाघमारे, गोविंद कांबळे, राजेंद्र वाघमारे, राम कांबळे, गंगाराम वाघमारे, माजी मुख्याध्यापक के.आर. वाघमारे, सेक्रेटरी विठ्ठल वाघमारे, धनंजय कांबळे, पप्पु वाघमारे, भरत वाघमारे, बाळू कांबळे, राजेंद्र वाघमारे, उत्तम वाघमारे, माधव वाघमारे, हरी वाघमारे, संतराम कांबळे, आप्पासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, बळीराम वाघमारे, राजेंद्र वाघमारे, परमेश्वर वाघमारे, सोहन उदबाळे आदींनी परिश्रम घेतले.

# शालेय शिवजयंती मंडळाच्या अध्यक्षपदी तेजल शिखरे

नांदेड- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून सर्वत्र विविध उपक्रम राबविण्यात येतात. तसेच विविध जाती धर्माचे लोक एकत्र येऊन शिवजयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी करतात. याचाच एक भाग म्हणून जवळा दे. येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शालेय शिवजयंती मंडळाची नुकतीच स्थापना करण्यात आली. या शालेय शिवजयंती मंडळाच्या अध्यक्षपदी तेजल शिखरे तर सचिवपदी सोनल गोडबोले यांची निवड करण्यात आली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ढवळे जी. एस., प्राथमिक पदवीधर शिक्षिका बडवणे एस. आर., विषय शिक्षक बेंबडे यु. एम., सहशिक्षक घटकार एस. एम., शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गोडबोले यांची उपस्थिती होती.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त लोहा तालुक्यातील जवळा दे. येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत स्थापन करण्यात आलेली उर्वरित कार्यकारिणी अशी: उपाध्यक्ष- अनन्या टिमके, कार्याध्यक्ष- मयुरी गोडबोले, कोषाध्यक्ष- शाहेद शेख, संघटक- विद्या गोडबोले, सदस्य - विश्वदीप झिंझाडे, प्रेम गोडबोले, सिद्धांत गोडबोले, पीरखाँ पठाण, अजिंक्य गोडबोले, नागेश मठपती. या मंडळाच्या वतीने चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, शिव ज्ञान चाचणी, भाषण स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याचे मुख्याध्यापक ढवळे जी. एस. यांनी सांगितले.

# एकाग्रता आणि आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली - शिवानंद स्वामी

हणेगाव(प्रतिनिधी):एकाग्रता आणि आत्मविश्वासाने अभ्यास केल्यास यशाचे शिखर गाठता येते त्यामुळे विद्यार्थ्यांनी याचा उपयोग करून यश मिळवावे असे प्रतिपादन शिवानंद स्वामी यांनी तालुक्यातील मानूर येथील शांतीवर्धक हायस्कूल येथे इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभात केले.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी पुरी होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मानव्य विकास विद्यालय देगलूर येथील शिक्षक शिवानंद स्वामी हे होते.

व्यासपीठावर केंद्रीय मुख्याध्यापक आलमपल्ले, बीम पवार,राजेंद्र पोकलवार, शिवाजी हेंकरे,बालाजी ढगे,र रामलिंग माळगे,श्री कदम , श्रीमती शिंदे,हे होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती च्या प्रतिमा




पूजनाने करण्यात आली.त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वागत गीताने उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण शाळेतील हिंदी चे शिक्षक माधव पटणे यांनी केले. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिवानंद स्वामी म्हणाले की मोबाईल व सोशल मीडियावर वेळ न घालवता विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे तेव्हाच परीक्षेत घवघवीत यश मिळेल. इयत्ता १० वी बोर्डाच्या परीक्षा या कॉपीमुक्त होणार असून विद्यार्थ्यांनी परीक्षेत वेळेचे योग्य नियोजन करून सर्व प्रश्न सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा असे आवाहन केले. परीक्षेला सामोरे कसे जावे याचे व्यवस्थित मार्गदर्शन करताना शिवानंद स्वामी यांनी विद्यार्थ्यांना सुसंस्काराची वाट चुकू नये अशी भावनिक हाक दिली. यासोबतच जीवनात येणाऱ्या संकटांना न घाबरता त्याला कसे सामोरे जावे हे सांगितले. यावेळी शाळेतील शिक्षक श्री कदम यांनी मनोगत व्यक्त केले.तसेच अनेक विद्यार्थ्यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शाळेतील शिक्षक तथा स्काऊट गाईड तालुका प्रमुख रवी जोशी यांनी केले तर अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक शिवाजी पुरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम केले.


# शालेय शिवजयंती मंडळाच्या अध्यक्षपदी तेजल शिखरे

नांदेड- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून सर्वत्र विविध उपक्रम राबविण्यात येतात. तसेच विविध जाती धर्माचे लोक एकत्र येऊन शिवजयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी करतात. याचाच एक भाग म्हणून जवळा दे. येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शालेय शिवजयंती मंडळाची नुकतीच स्थापना करण्यात आली. या शालेय शिवजयंती मंडळाच्या अध्यक्षपदी तेजल शिखरे तर सचिवपदी सोनल गोडबोले यांची निवड करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ढवळे जी. एस., प्राथमिक पदवीधर शिक्षिका बडवणे एस. आर., विषय शिक्षक बेंबडे यु. एम., सहशिक्षक घटकार एस. एम., शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गोडबोले यांची उपस्थिती होती.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त लोहा तालुक्यातील जवळा दे. येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत स्थापन करण्यात आलेली उर्वरित कार्यकारिणी अशी: उपाध्यक्ष- अनन्या टिमके, कार्याध्यक्ष- मयुरी गोडबोले, कोषाध्यक्ष- शाहेद शेख, संघटक- विद्या गोडबोले, सदस्य - विश्वदीप झिंझाडे, प्रेम गोडबोले, सिद्धांत गोडबोले, पीरखाँ पठाण, अजिंक्य गोडबोले, नागेश मठपती. या मंडळाच्या वतीने चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, शिव ज्ञान चाचणी, भाषण स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याचे मुख्याध्यापक ढवळे जी. एस. यांनी सांगितले.


# बिचकुंदा येथे महाशिवरात्री निमित्त तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन

**शिवानंद स्वामी**

देगलूर: देगलूर पासून २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या बिचकुंदा (जिल्हा कामारेड्डी,तेलंगाना) येथील सद्गुरु बंडयाप्पा मठ संस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे महाशिवरात्रीनिमित्त तीन दिवसीय भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मठाधिपती ष.ब्र.१०८ सोमलिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर यांनी केले आहे.



१५ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ ते ६ पर्यंत रुद्राभिषेक,सकाळी ८ वाजता अघोर पशुपती हवन होईल. सायंकाळी ६ पासून भक्तिसंगीत व तेलंगणा ,महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.

यावेळी इष्टलिंग पूजा,शिव पार्वती कल्याण महोत्सव व रात्री १२ वाजता विशेष महारुद्रभिषेक व श्री सोमलिंग शिवाचार्य महाराज महाराज यांचे अमृत उपदेश व महामंगल आरतीचा कार्यक्रम संपन्न होईल.

सोमवार १६ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ ते नऊ दरम्यान लिंगदीक्षा कार्यक्रम आणि त्यानंतर सकाळी नऊ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत महाप्रसादाचे कार्यक्रम ठेवण्यात आले आहे त्यानंतर पाच वाजता विद्युत रोषणाई मध्ये भव्य दिव्य असा रथोत्सव कार्यक्रम होणार आहे रात्री सात पासून विविध शाळेच्या विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होऊन त्यांना प्रथम द्वितीय बक्षिसांचा वितरण कार्यक्रम होणार आहे.

मंगळवार १७ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ ते अकरा वाजेपर्यंत श्री काशी विश्वनाथ स्वामींना रुद्राभिषेक महा बिलवार रचना आणि दुपारी एक ते पाच वाजेपर्यंत कुस्त्यांचे दंगल होईल आणि महाप्रसादाने कार्यक्रमाची समाप्ती होईल.

सदरील तीन दिवसीय कार्यक्रमात तेलंगाना महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील चार ते पाच लाख भाविक येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

या तीन दिवसीय महाशिवरात्री महोत्सव मध्ये जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन श्री महाशिवरात्री महोत्सव कमिटी बिचकुंदा, बोरलेम देगलूर आणि गावकरी मंडळींच्या वतीने करण्यात आले आहे.



# नांदेड जिल्हा ग्रंथोत्सव १४ व १५ मार्च रोजी होणार पूर्वतयारीची बैठक संपन्न

नांदेड(प्रतिनिधी): - नांदेड जिल्हा ग्रंथोत्सव १४ व १५ मार्च रोजी आयोजित करण्यात येणार असून, त्याअनुषंगाने ग्रंथोत्सव २०२५ साठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात पूर्वतयारीची बैठक आज संपन्न झाली.

या बैठकीत विविध क्षेत्रातील साहित्यिक, प्रकाशक व ग्रंथालय क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग होता. दोन दिवसीय ग्रंथोत्सवात विविध विषयांवरील परिसंवाद, साहित्य चर्चा, पुस्तक प्रदर्शन, लेखक-वाचक संवाद तसेच इतर सांस्कृतिक व बौद्धिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे सदस्य सचिव तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सुर्यवंशी यांनी ग्रंथोत्सवाची सविस्तर रूपरेषा मांडली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

बैठकीस जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र हंबिरे, मसापचे सचिव महेश मोरे, शिक्षण विस्तार अधिकारी रोहिदास बस्वदे, प्रकाशन संघटनेचे निर्मलकुमार सुर्यवंशी तसेच संजय पाटील, राणा मेटकर, संतोष देशमुख, पुंडलिक कदम, जगदीश धोंड, गोविंद वडगावकर, स्वप्नाली पाठक, ललिता गोणारकर, गंगाधर गोणारकर, गजानन देवसरकर, शिवाजी सुर्यवंशी, अजय वट्टमवार आदी उपस्थित होते. प्रताप सुर्यवंशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नांदेड जिल्ह्यातील १० विद्यार्थ्यांची 'इस्त्रो' अभ्यास दौर्यासाठी निवड

नांदेड(प्रतिनिधी) : इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या खाजगी अनुदानित विजाभज आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. हा दौरा बेंगलूरु, तिरुवनंतपुरम आणि कन्याकुमारी येथे १५ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे.

राज्यभरातून परीक्षेद्वारे एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील ३ आश्रमशाळांमधील १० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. नांदेड जिल्ह्यातील आश्रमशाळांमधील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील हे विद्यार्थी या शैक्षणिक दौर्यासाठी रवाना होणार असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक सचिन खुणे यांनी दिली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती पुढीलप्रमाणे स्व. संगीता देवी उच्च माध्यमिक आश्रमशाळा, दहेली तांडा ता. किनवट , कु. संजीवनी शिवाजी चव्हाण, म. फुले मा. व. उच्च माध्यमिक आश्रमशाळा, वाघाळा ता. नांदेड, चि. जाधव अमेय प्रेम, चि. हेळगिरे दत्ता बालाजी, विद्यानिकेतन (पब्लिक स्कूल), कमळेवाडी ता. मुखेड जि. नांदेड, चि. आयुष अशोक पोफाळे, चि. करणराम किशन चौगुले, कु. कालेकर आश्विनी निवृत्ती, कु. निकिता धोंडिबा केंद्रे, कु. दुर्गा दत्ता खांडरे, कु. दिक्षा जीवन चव्हाण. चि. राहुल संभाजी शिरसाट, इस्त्रोसारख्या राष्ट्रीय दर्जाच्या अंतराळ संशोधन संस्थेला भेट देण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या यशाबद्दल विद्यार्थ्यांवर विविध स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, ही बाब नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरत आहे.

# शिक्षण व्यवस्थेत क्रांतिकारी बदल घडविणे गरजेचे आहे :पद्मश्री डॉ. अभय बंग

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर (प्रतिनिधी) आजच्या शिक्षण व्यवस्थेला स्टेटस्कोप लावून पाहिले पाहिजे. कारण आज या देशात दहा कोटी पेक्षा अधिक युवक आहेत. देशातल्या युवकांना आजची शिक्षण व्यवस्था जीवनानुभिमूक शिक्षण देऊ शकत नाही. भारत युवा सुपर पॉवर असूनही दुर्दैव असे की, त्यांनाही या शिक्षण व्यवस्थेने ध्येयहिन आणि संदर्भहीन केले आहे. त्यामुळे आजचे शिक्षण खऱ्या अर्थाने कुचकामी ठरले आहे. यासाठी शिक्षण व्यवस्थेत क्रांतिकारी बदल गरजेचे आहे. असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री मा. डॉ. अभय बंग यांनी शाहू व्याख्यानमाले अंतर्गत ६४ वे पुष्प गुंफताना व्यक्त केले. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सचिव श्री बी.बी. ठोंबरे, सहसचिव डॉ. शिवाजीराव सूर्यवंशी, श्री



उद्धवराव पाटील, सदस्य डॉ . आर. एल. कावळे, श्री. धर्मराज हल्लाळे, प्राचार्य अनिरुद्ध जाधव, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. संभाजी पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

शिव छत्रपती शिक्षण संस्था संचलित राजर्षी शाहू महाविद्यालय (अधिकारप्रदत्त स्वायत्त), लातूर येथे १२ फेब्रुवारी २०२६ रोजी शाहू व्याख्यानमाले अंतर्गत पर्यायी शिक्षण शक्य आहे या विषयावर बोलताना पूढे डॉ. बंग यांनी राईट टू एज्युकेशनवर आपण बोलतो मात्र, आपण जे शिक्षण देत आहोत ते राईट आहे की केवळ आपण माहिती देत आहोत ते तपासून पाहिले पाहिजे. कौशल्य थोडेसे शिकवतो परंतू त्याचा उपयोग कसा करायचा ते सांगत नाही. ऑक्सफर्ड विद्यापीठातील संशोधनात २०५० मध्ये शिक्षणात काय होईल, यावर विवेचन केले आहे. त्यानुसार संगणक आणि एआय शिक्षण आणि रोजगाराचे स्वरूप बदलून टाकेल. केवळ माहिती देणाऱ्या शिक्षकांना भविष्य नाही. यांत्रिक काम करणाऱ्या डॉक्टरांना भविष्य नाही. भावनिक आधार देणारे सेवेचा ऋणानुबंध जोडणारे डॉक्टर, परिचारिका मोठ्या प्रमाणात लागतील. व्यायाम प्रशिक्षक लागतील. परंतू, केवळ बुध्दीजीवी काम करणारे सर्जनशील झाले नाहीत तर ते खच्या प्रवाहात टिकणार नाहीत. शेतकऱ्यांना शेती कोणत्या शाळेत शिकवली गेली नाही. त्यांचे कर्म हेच ज्ञान झाले. आपल्या अवतीभवतीचे जीवन ज्ञान, शिक्षण यापासून शिक्षक, पालकांनी विद्यार्थ्यांना तोडू नये. असे आवाहन ही केले.

नई तालीम हाच शिक्षणाचा नवा पर्याय आहे असे प्रतिपादन करताना शिक्षण क्षेत्रातील प्रत्येकाने विनोबा भावेंचे शिक्षण विचार हे पुस्तक वाचले पाहिजे. महात्मा गांधींनी नई तालीम ही शिक्षण व्यवस्था सांगितली. त्यामध्ये प्रत्यक्ष कृतीतून कामातून शिक्षणाचे धडे होते. सुत किती काढले त्याचे गणित होतं. शेती करताना कृषी, अर्थ, वनस्पतीशास्त्र या विषयांचा अभ्यास होता. शाळेच्या खानावळीत काम करताना आहारशास्त्र प्रोटीन, विटॅमीन, न्युट्रीशियन शिकायला मिळाले. त्यामुळे पारंपारिक शिक्षण देत असताना शाळांनी जीवनाशी जोडणारे छोटछोटे प्रयोग केले पाहिजे. असेही डॉ. अभय बंग म्हणाले

अध्यक्षीय विचारातून डॉ. गोपाळराव पाटील यांनी संदेश दिले की, नवे प्रयोग, नव्या कल्पनांच्या माध्यमातून संस्था, शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांच्या मनाला स्पर्श करत मी एक शिक्षक व पालक म्हणून विद्यार्थ्यांसाठी काय बदल करु शकतो. मुलांशी कसं माणुसकीने वागू शकतो. शिक्षण फक्त आकड्या पुरते मर्यादित न राहता मूल्यांशी कसे जोडू शकतो या बाबींचा विचार केला पाहिजे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. सुदर्शन पाटील, सूर्यकांत चव्हाण यांनी केले.




# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात कॅम्पस ड्राईव्ह उत्साहात संपन्न

## १७५ विद्यार्थ्यांचा सहभाग; गटचर्चा व ऑनलाईन परीक्षेद्वारे निवड प्रक्रिया

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात दयानंद एज्युकेशन सोसायटीतर्फे जेड (जेएडीई) सॉफ्टवेअर कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडला. या उपक्रमासाठी एकूण १७५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. विद्यार्थ्यांसाठी गटचर्चा तसेच ऑनलाईन परीक्षा यशस्वीपणे पार पडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षण व रोजगार समन्वयक अनिल बिरादार, उपप्राचार्य डॉ.जी. आर. लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. एम.एस. अष्टेकर, संगणक विभागप्रमुख डॉ. एस.व्ही. स्वामी, व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. व्ही.बी. सातपुते तसेच सहाय्यक प्रा. डी.जे. शेख यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या सत्काराने करण्यात आली. अनिल बिरादार यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. प्रमुख पाहुणे डॉ.दरगड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत भविष्यातील करिअर संधींबाबत माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. मान्नीकर यांनी अशा उपक्रमांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवावे, असे आवाहन केले. मुलाखत प्रक्रियेदरम्यान निलीमा घोडेराव व रिया सावंत यांनी कंपनीविषयी सविस्तर माहिती देत पॅनल सदस्य म्हणून सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाझिया पठाण यांनी केले, तर शेवटी प्रा.जी. एम.जोशी यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.महावरकर, प्रा.सुहाना शेख प्रा. एस. चिकटे प्रा. एन.एस. वाघमारे प्रा. व डॉ. के.डी. औसेकर यांनी परिश्रम घेतले. तसेच बीसीए द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून कार्य करत कार्यक्रम यशस्वी केला.

# प्रभावी रिझ्युम बनवा अन् करिअर घडवा: डॉ.चौधरी

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : सध्याचे युग स्पर्धे चे युग असले तरी करिअर घडविण्यासाठी आज एकविसाव्या शतकात अनेक क्षेत्र खुले आहेत. आपापल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर घडविले पाहिजे.म्हणूनच मुलाखत व नोकरीसाठी प्रत्येकांनी प्रभावी रिझ्युम तयार करणे अत्यंत गरजेचे आहे.रिझ्युममध्ये स्वत:चे नाव,संपर्क माहिती, करिअरचे उद्दिष्ट,कामाचा अनुभव,शिक्षण आणि कौशल्ये यांचा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे.तांत्रिक आणि सॉफ्ट स्किल्स याचीही नोंद केली पाहिजे.रिझ्युममध्ये व्याकरण आणि स्पेलिंगच्या चुका टाळल्या पाहिजेत,असे प्रतिपादन निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयातील इंग्रजी विभागातील प्रा.डॉ.ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले.



येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या वतीने दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी ' यशासाठी एक प्रभावी रिझ्युम तयार करणे ' या उद्बोधनपर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले होते.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.त्यांनी रिझ्युमच्या विविध प्रकारांचे विश्लेषण केले. तसेच रिझ्युम,बायोडाटा आणि सी.व्ही. यातील फरक स्पष्ट केला. प्रभावी रिझ्युम राईटिंगसाठी महत्वपूर्ण टिप्स दिल्या ज्या विद्यार्थ्यांना भविष्यात फायदेशीर ठरतील.याप्रसंगी व्याख्यान कार्यक्रम समन्वयक इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित,हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.मेघा पंडित यांनी केले तर आभार वेदांगी वाघे या विद्यार्थीनीने मानले.या कार्यक्रमासाठी संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. अवंती बिडकर यांचेही सहकार्य लाभले.यावेळी सुनील राक्षे, राजेसाहेब पांचाळ यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व बी.एस्सी.,बीसीएस.,बायोटेकचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात प. पू. गोळवलकर गुरुजींना अभिवादन

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर / प्रतिनिधी- येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक परमपूजनीय श्री गोळवलकर गुरुजी यांच्या तिथीनुसार जयंती निमित्ताने त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात मंचावरील मान्यवरांच्या हस्ते भारत माता व प. पू. श्री गोळवलकर गुरुजी यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्यध्यापक बालासाहेब केंद्रे, प्रमुख पाहुणे विस्तारसेवा कार्य समिती संस्था प्रमुख तथा विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक जितेंद्र जोशी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे जितेंद्र जोशी यांनी संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू . गोळवलकर गुरुजी यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. ज्यांच्या जीवनाचे अंतिम ध्येय मातृभूमीची



सेवा हेच होते, ते गुरुजी होय असे सांगितले. संघ व सामाजिक समरसता या विषयाची मांडणी करताना असे म्हणाले, की समाज जीवनात शैक्षणिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, राजकीय क्षेत्र, क्रीडाक्षेत्र, विज्ञान, वनवासी अशा अनेक क्षेत्रांमध्ये संघाचे कार्य सुरू आहे. 'माणसाने माणसाशी माणसासम वागणे' हेच संघाला अभिप्रेत आहे. समरसता ही केवळ जाती व्यवस्थेतील समरसता नव्हे, तर सर्व क्षेत्रातील समरसता होय. समाजात समभाव व ममभाव ठेवून संघ काम करत आहे, असे याप्रसंगी त्यांनी सांगितले. याप्रसंगी विद्यालयातील संगीत शिक्षक संतोष बीडकर यांनी प्रेरणा गीत सादर केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अश्विनी स्वामी यांनी केले तर जान्हवी देशमुख यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. ज्ञानोपासक मंडळांतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, कार्यक्रम प्रमुख ग्रंथपाल अभय गोस्वामी, अमोल गायकवाड तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात संशोधन लेखनावर मार्गदर्शक सत्र संपन्न




दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : दयानंद एज्युकेशन सोसायटी संचलित दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथील पी.जी. प्रोजेक्ट रिसर्च कमिटीच्या वतीने संशोधन लेखन मसुदा या विषयावर एकदिवसीय मार्गदर्शक सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सतीश लक्ष्मणराव कुंडलवार, सहयोगी प्राध्यापक, शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ यांनी संशोधन लेखनाची रूपरेषा, लेखन पद्धती, संशोधनातील महत्त्वाचे घटक तसेच संशोधन लेख सादरीकरणाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. जी.आर. लहाने, डॉ. बी.टी. चव्हाण व डॉ. एम.एस. आष्टेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रस्तावना डॉ. बी.जी. कळंबे यांनी केली. सूत्रसंचालन रेश्मा सय्यद यांनी केले, तर आभार प्रदर्शन वर्षा पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विशाल वर्मा, डॉ. रूपा गिल्डा, डॉ. अनुजा कांबळे, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी, प्रा. साक्षी पाटील, प्रा. सुहाना शेख व प्रा. अमृता बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले. हे सत्र विद्यार्थ्यांसह संशोधन करणाऱ्या अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले असून, संशोधन लेखनाबाबत नवे दृष्टिकोन मिळाल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

# प्रा. डॉ. सुदर्शन मोरे यांना जीवन गौरव पुरस्कार

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर (प्रतिनिधी) येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील माजी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सुदर्शन मोरे यांना नुकताच महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर येथे जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर परिषदेच्या बेचाळीसाव्या अधिवेशनात हा पुरस्कार देण्यात आला.

प्रा.डॉ. सुदर्शन मोरे यांनी महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अध्यक्षपद एक वर्ष तर सरचिटणिसपद आठ वर्षे भुषविले आहे. तसेच भारतीय राज्यशास्त्र परिषदेचे (IPS) कार्यकारिणी सदस्य आणि मराठवाडा राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अध्यक्षपदी योगदान दिले आहे. राजर्षी शाहू महाविद्यालय येथे ३५ वर्षे शैक्षणिक सेवा दिलेली असून विभागप्रमुख पदी यशस्वी कार्य केले आहे.



महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत आदर्श राज्यशिक्षक पुरस्कार त्यांनी प्राप्त केलेला असून राज्याचे राज्यपाल तथा कुलपती यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकच्या व्यवस्थापन व नियोजन मंडळावर नियुक्ती केली आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेवर नेमणुक केली.

प्रा. डॉ. सुदर्शन मोरे हे ज्येष्ठ राजकीय विश्लेषक असून सर्वेक्षण आणि निर्वाचन शास्त्र या विषयात त्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे. 'श्री विलासराव देशमुख यांच्या राजकीय नेतृत्वाचे विश्लेषणात्मक अध्ययन' या प्रबंधास संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने एम.फिल. तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पी.एच.डी. पदवी प्रदान केली आहे. डॉ. मोरे यांच्या कार्यकतृत्वाचा गौरव व्हावा म्हणून जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केल्याबद्दल चे शैक्षणिक क्षेत्रात अभिनंदन होत आहे.

# दयानंद वाणिज्य मध्ये कला आणि कौशल्य कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## युवती कल्याण मंडळाचा पुढाकार; ७० विद्यार्थिनींचा सहभाग



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : दयानंद शिक्षण संस्था अंतर्गत कार्यरत असलेल्या दयानंद वाणिज्य महाविद्यालयात युवती कल्याण मंडळाच्या वतीने कला आणि कौशल्य या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थिनींमधील सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि विविध कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी मार्गदर्शन करताना कला आणि कौशल्य यांचे वैयक्तिक तसेच व्यावसायिक आयुष्यातील महत्त्व अधोरेखित केले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून विविध कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या दोन दिवसीय कार्यशाळेत चॉकलेट बुके, फोटो बुके, रेझिन आर्ट वर्क, उलन पॅच रांगोळी अशा उपक्रमांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. एकूण ७० विद्यार्थिनींनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उपक्रमांचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा अष्टेकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, बीबीए-एमबीए विभाग प्रमुख वैशाली सातपुते, बीसीए-एमसीए विभाग प्रमुख डॉ. शशिकांत स्वामी तसेच युवती कल्याण मंडळाच्या प्रभारी डॉ. प्रिया वर्मा मंचावर उपस्थित होते.

समारोपप्रसंगी सहभागी विद्यार्थिनींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वप्नाली शरणार्थी यांनी केले, तर प्रा. कृष्णाई पाचंगे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. गीतांजली जोशी, प्रा. दिपाली शेख, प्रा. स्नेहल पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. ही कार्यशाळा विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी व उपयुक्त ठरली असून, भविष्यात अशाच प्रकारचे उपक्रम राबविण्याचा मानस संस्थेतर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

# भैरवनाथ माध्यमिक विद्यालयात स्वंयशासन दिन व निरोप समारंभ संपन्न

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर - बभैरवनाथ माध्यमिक विद्यालया मध्ये इयत्ता दहावी वर्गातील विद्यार्थ्यांचा स्वंयशासन दिन साजरा करण्यात आला, यात मुख्याध्यापक पदी नागेश सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक पदी सृष्टी माळी, लिपिक श्रदा जाधव, सेवक नागेश इटकर आदींनी भूमिका पार पडली इतर विद्यार्थ्यांनी सहशिक्षक म्हणून विविध विषयांचे अध्यापन केले, स्वय शासन दिनानिमित्त सहभागी विद्यार्थ्यांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला,तसेच इयत्ता दहावी वर्गातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ देखील आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमाचे उद्घाटन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन ने करण्यात आले, या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सिद्धेश्वर जाधव, प्रमुख पाहुणे संस्था कोषाध्यक्ष विवेक माने, प्रशासकीय अधिकारी जी टी माने आदींची उपस्थिती होती,यावेळी प्रज्ञा उबाळे,श्रद्धा जाधव, सृष्टी माळी,शिंदे वैष्णवी, ऋतुजा भडंगे या विदयार्था नी मनोगत व्यक्त केले, यावेळी जी टी माने, धोंडीबा चवळे, अशोक ढाले इत्यादी सह शिक्षकांनी सदिच्छा व्यक्त केल्या,या कार्यक्रम चे सूत्रसंचालन कल्याण पवार तर आभार सौ पंचशीला कांबळे यांनी मानले,या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन जाधव, सचिन सूर्यवंशी,सूर्यकांत पांचाळ आदींनी परिश्रम घेतले.